Vol III Issue IX March 2014 ISSN No :2231-5063

International Multidisciplinary Research Journal

Golden Research Thoughts

Chief Editor
Dr.Tukaram Narayan Shinde

Publisher
Mrs.Laxmi Ashok Yakkaldevi

Associate Editor
Dr.Rajani Dalvi

Honorary
Mr.Ashok Yakkaldevi

Welcome to GRT

RNI MAHMUL/2011/38595 **ISSN No.2231-5063**

Golden Research Thoughts Journal is a multidisciplinary research journal, published monthly in English, Hindi & Marathi Language. All research papers submitted to the journal will be double - blind peer reviewed referred by members of the editorial board.Readers will include investigator in universities, research institutes government and industry with research interest in the general subjects.

International Advisory Board

Flávio de São Pedro Filho
Federal University of Rondonia, Brazil

Kamani Perera
Regional Center For Strategic Studies, Sri Lanka

Janaki Sinnasamy
Librarian, University of Malaya

Romona Mihaila
Spiru Haret University, Romania

Delia Serbescu
Spiru Haret University, Bucharest, Romania

Anurag Misra
DBS College, Kanpur

Titus PopPhD, Partium Christian University, Oradea,Romania

Mohammad Hailat
Dept. of Mathematical Sciences, University of South Carolina Aiken

Abdullah Sabbagh
Engineering Studies, Sydney

Catalina Neculai
University of Coventry, UK

Ecaterina Patrascu
Spiru Haret University, Bucharest

Loredana Bosca
Spiru Haret University, Romania

Fabricio Moraes de Almeida
Federal University of Rondonia, Brazil

George - Calin SERITAN
Faculty of Philosophy and Socio-Political Sciences Al. I. Cuza University, Iasi

Hasan Baktir
English Language and Literature Department, Kayseri

Ghayoor Abbas Chotana
Dept of Chemistry, Lahore University of Management Sciences[PK]

Anna Maria Constantinovici
AL. I. Cuza University, Romania

Horia Patrascu
Spiru Haret University, Bucharest,Romania

Ilie Pintea,
Spiru Haret University, Romania

Xiaohua Yang
PhD, USA

.....More

Editorial Board

Pratap Vyamktrao Naikwade
ASP College Devrukh,Ratnagiri,MS India

R. R. Patil
Head Geology Department Solapur University,Solapur

Rama Bhosale
Prin. and Jt. Director Higher Education, Panvel

Salve R. N.
Department of Sociology, Shivaji University,Kolhapur

Govind P. Shinde
Bharati Vidyapeeth School of Distance Education Center, Navi Mumbai

Chakane Sanjay Dnyaneshwar
Arts, Science & Commerce College, Indapur, Pune

Awadhesh Kumar Shirotriya
Secretary,Play India Play,Meerut(U.P.)

Iresh Swami
Ex - VC. Solapur University, Solapur

N.S. Dhaygude
Ex. Prin. Dayanand College, Solapur

Narendra Kadu
Jt. Director Higher Education, Pune

K. M. Bhandarkar
Praful Patel College of Education, Gondia

Sonal Singh
Vikram University, Ujjain

G. P. Patankar
S. D. M. Degree College, Honavar, Karnataka

Maj. S. Bakhtiar Choudhary
Director,Hyderabad AP India.

S.Parvathi Devi
Ph.D.-University of Allahabad

Sonal Singh,
Vikram University, Ujjain

Rajendra Shendge
Director, B.C.U.D. Solapur University, Solapur

R. R. Yalikar
Director Managment Institute, Solapur

Umesh Rajderkar
Head Humanities & Social Science YCMOU,Nashik

S. R. Pandya
Head Education Dept. Mumbai University, Mumbai

Alka Darshan Shrivastava
Shaskiya Snatkottar Mahavidyalaya, Dhar

Rahul Shriram Sudke
Devi Ahilya Vishwavidyalaya, Indore

S.KANNAN
Annamalai University,TN

Satish Kumar Kalhotra
Maulana Azad National Urdu University

Address:-Ashok Yakkaldevi 258/34, Raviwar Peth, Solapur - 413 005 Maharashtra, India
Cell : 9595 359 435, Ph No: 02172372010 Email: ayisrj@yahoo.in Website: www.aygrt.isrj.net

Golden Research Thoughts
ISSN 2231-5063
Volume-3 | Issue-9 | March-2014
Available online at www.aygrt.isrj.net

डॉ. आनंद यादव यांच्या 'झोंबी ' तील स्त्री व्यक्तिरेखा

बाबुराव उपाध्ये

सहयोगी प्राध्यापक मराठी विभाग, प्रमुख
रा.ब.नारायणराव बोरावके महाविद्यालय, श्रीरामपूर

सारांश :-'झोंबी' ही आनंद यादव यांची आत्मपर कादंबरी आहे. ती 1987 मध्ये प्रकाशित झाली. 1990 मध्ये या पुस्तकाला साहित्य अकादमीचा पुरस्कार प्राप्त झाला. 'झोंबी' तील आत्मपर लेखन हे आनंद यादव यांच्या शैक्षणिक धडपडीवर प्रकाश टाकते.

प्रस्तावना :-

दहावीपर्यंतच्या शैक्षणिक वाटचालीचा एक ग्रामीण जीवनानुभव व्यक्त करतानाच यादवांनी आपल्या कुटुंबाचे व समाजाचे चित्रण केले आहे. यामध्ये स्त्रीजीवनाचा अनेक पदरी जीवन संघर्षही येथे नजरेत भरणारा आहे. स्त्रीजीवनाचा एक धागा पकडून 'झोंबी' चे येथे मूल्यमापन केले आहे.

'झोंबी' : लेखक व्यक्तीविशेष – अभिजात साहित्यिक आणि चिकित्सक संस्कृती मीमांसक म्हणून डॉ. आनंद यादव अवघ्या महाराष्ट्रात ओळखले जातात. ग्रामीण साहित्याचे प्रवक्ते म्हणून त्याचा लौकिक आहे. ग्रामीण कवी, कथाकार, कादंबरीकार, समीक्षक अशा अनेक नात्यांनी मराठी माणूस त्यांना ओळखतो.

1960 नंतर मराठी साहित्यात जे परिवर्तन झाले, नवे साहित्यिक उदयाला आले त्यामध्ये ग्रामीण साहित्य प्रवाहात आनंद यादवांचे नाव अग्रगण्य आहे.

कोल्हापूरजवळ असलेल्या कागलमध्ये 30 नोव्हेंबर 1935 ला यादवांचा जन्म झाला. कुळाने शेती करणा–या घराण्यात जन्मलेल्या बारा मुलांत त्यांचा क्रम तिसरा आहे. दारिद्रय, उपासमार, अज्ञान अशा प्रतिकूल परिस्थितीत कुटुंबातल्या माणसांचा विरोध पत्करून त्यांनी एम. ए. मराठी संस्कृत पर्यंतचे शिक्षण पूर्ण केले. प्राध्यापक झाले. पुढे पीएच. डी. केली पुणे विद्यापीठ येथील मराठी विभागात प्रपाठक नंतर विभाग प्रमुख झाले. 30 नोव्हेंबर 1995 ला ते सेवानिवृत्त झाले.

प्राध्यापक झाल्यानंतर यादवांनी आपला पुण्यातला संसार सावरीत असलेल्या कुटुंबाला समर्थ बनविले. आई, वडील, भाऊ, बहिणी इत्यादींच्या सुखदुःखाकडे लक्ष देवून आपल्या गावाकडच्या घरभिंती मजबूत केल्या. याच अपेक्षेने त्यांनी कठोर परिश्रम करून शिक्षण घेतले. आपल्य कुटुंबाची दारिद्रयाच्या उपासमारीच्या व अज्ञानाच्या गर्तेतून सुटका करून घ्यायची असेल तर आपण शिक्षण घेतलेच पाहिजे, या कौटुंबिक जिव्हाळयातून ते शिकले व या शिक्षणाचा उपयोग सर्वांसाठी केला. ग्रामीण भागातल्या नवशिक्षित पिढीपुढील एक आदर्श व्यक्तिमत्व म्हणून उभा महाराष्ट्र यादवांकडे पाहतो.

डॉ. आनंद यादवांचे आत्मपर लेखन – डॉ. आनंद यादव यांनी आपले आत्मचरित्र, 'झोंबी', 'नांगरणी', 'घरभिंती' आणि 'काचवेल' या चार खंडातून विस्तृतपणे सांगितले आहे. स्वतःला घडवित, शोधित जाणा–या मराठी मनाचा प्रखर वास्तववादी आविष्कार येथे दिसतो. आपल्या सलग आत्मपर लेखनामागची सूत्रमांडणी सांगताना ते म्हणतात, "...आत्मचरित्र हे जीवनभाष्य असतं, मी जीवनभाष्याचा मार्ग सोडून माझं जीवनदर्शन घडविण्याचा मार्ग स्वीकारला. जीवनदर्शन घडवणं हे ललित साहित्याचं आद्यध्येय असतं, म्हणून ललित साहित्याच्या अंगाने आपण आत्मचरित्र लिहावं. मी कसा जगलो, काय काय घडलं याच दर्शन आपण घडवू शकतो, कारण आपण ललित साहित्य लेखक आहोत म्हणून आत्मचरित्रात्मक कादंबरीचा मार्ग स्वीकारला. आत्मचरित्रात्मक कादंबरीचा मार्ग स्वीकारला. आत्मचरित्राच्या या लेखनात काल्पनिक काही नाही. कादंबरीचं फक्त बाह्यरूप स्वीकारलं आहे. आशय, अनुभव, व्यक्ती, घटना, प्रसंग, वातावरण सगळं काही माझ्या जीवनातीलच आहे."[01] अशा या आत्मपर कादंबरीलेखन मालिकेतून यादवांचे समग्र जीवनदर्शन वाचकांसमोर उभे राहते.

"झोंबी", 'नांगरणी', 'घरभिंती' आणि "काचवेल" ही चारही पुस्तके मेहता पब्लिशिंग हाऊस पुणे यांनी प्रकाशित केली. ती अनुक्रमे डिसेंबर 1987, ऑगस्ट 1990, आणि ऑगस्ट 1997 या काळात प्रकाशित झाली आहेत. या पुस्तकांची पृष्टसंख्या अनुक्रमे 363, 340, 522 आणि

328 अशा 1563 पृष्ठांमध्ये यादवांचे जीवनदर्शन साकार झाले आहे.

''झोंबी'' ची निर्मिती प्रेरणा – ''झोंबी'' या आत्मचरित्रात्मक कादंबरीत यादवांच्या शैक्षणिक धडपडीची कहाणी आली आहे. 1978 च्या आसपास ते महाराष्ट्राच्या ग्रामीण भागातून भरपूर फिरले. व्याख्याने, परिसंवाद, चर्चासत्रे यानिमित्ताने त्यांनी मराठी माणसांच्या दुःखाचे, शोषणाचे मूळ समजून घेतले. त्यांच्या लक्षात आले की ग्रामीण तरूणपिढी शिक्षणविषयी, जीवनविषयी उदास निराशाग्रस्त आहे. यामागे सामाजिक, राजकीय, आर्थिक अशी अनेक कारणे होती. यादवांच्या मनात विचार आला ग्रामीण तरूणाने शिक्षणाचे महत्त्व, त्याचे व्यक्तिमत्त्वावर होणारे संस्करण समजून घेतले पाहिजेत. शिक्षणाने माणूस समजूतदार होतो. तो कोणत्याही घटनेसंबंधी स्वतंत्र, संतुलीत विचार करू शकतो. आसपासचे भौतिक जग व स्वतःचे जीवन तो समजून घेऊ शकतो. प्रकृतीवर शिक्षणाचे संस्कार होऊन मानवी संस्कृती निर्माण होते. अशा तऱ्हेने विचार मांडतानाच यादवांना वाटले, ''माझे स्वतःचे जीवन हेच माझ्या विचारांचे दृष्टांत होऊ शकतील. आपण ते आत्मचरित्रात्मक कादंबरीच्या रूपाने मांडावे. त्याचा प्रभाव तरूण पिढीवर पडू शकेल. म्हणून आत्मचरित्रात्मक कादंबरी लेखनाचा विचार करू लागला होतो''[02] ध्येयातून ''झोंबी'' ची निर्मिती झाली.

''झोंबी'' चे वेगळेपण – ''झोंबी'' ला पु.ल. देशपांडे यांची विस्तृत प्रस्तावना लाभली आहे. ''झोंबी'' एक बाल्य हरवलेलं बालकांड अशा शीर्षकाखाली लिहिलेल्या या प्रस्तावनेत पु.ल. देशपांडे म्हणतात, ''आनंदाचं आणि रात्रंदिवस शारीरिक कष्ट करून दोन वेळची भाकरी न मिळणाऱ्या त्या आर्थिक स्तरातल्या हजारो मुलाचं आयुष्य, ह्याचं काट्याकुट्यांनी भरलेल्या वाटेनं गेलं, आजही परिस्थितीत फार प्रचंड फरक नाही ती वाट आनंदाच्या कोवळ्या पावलांनी कशी तुडवली याची ही आत्मकथा आहे. आत्मचरित्रात पुष्कळदा आत्मप्रौढी आणि आत्मसमर्थन डोकावते. सुदैवाने ह्या कथेत हे दोन्ही दोष नाहीत,''[03] मॅट्रिकपर्यंतचे शिक्षणापर्यंतचा कालावधी या कालंबरीत चित्रित झाला आहे.

''झोंबी'' ने मराठी साहित्यात आपले वेगळे असे स्थान निर्माण केले आहे. आजच्या आर्थिक आणि सामाजिक परिस्थितीत अस्वस्थ होऊन धुमसणे हाच ग्रामीण जीवनाचा स्थायीभाव आहे. त्या अस्वस्थपणाचा स्फोट मराठी साहित्यात सुरू झालाच आहे. हे व्हायला हवेच होते. शिवाय साऱ्या जगातलं साहित्य समृध्द केलं आहे. ते या ''झोंबी'' सारख्या वाचकाला अस्वस्थ करणाऱ्या ग्रंथानीच,''[04] हे पु.लं. देशपांडे यांचे उद्‌गार ''झोंबी'' च्या वेगळेपणाची साक्ष देतात.

''झोंबी'' तील स्त्रीजीवन– भारतीय संस्कृती ही पुरूषप्रधान आहे. पुरूषप्रधान आहे. पुरूष हा कुटुंबाचा प्रधान घटक मानला जातो. कुटुंबातील सदस्य एकमेकांसाठी झटत असतात, आधार देत असतात. त्यामध्ये स्त्री ही कुटुंबातील महत्वाची व्यक्ति समजली जाते.

स्त्री ही कुटुंबासाठी सतत काबाडकष्ट करते. ती कन्या, बहीण, सून, पत्नी, आई, सासू, आजी, अशा अनेक नात्यांनी कुटुंबाशी बांधलेली असते. ग्रामीण भागात या नात्यांना, भूमिकांना आजही महत्त्वपूर्ण स्थान आहे. या सर्वांचे भान ठेवून आनंद यादव यांनी ''झोंबी'' मध्ये स्त्रीजीवनाचे चित्रण केले आहे. त्यातील स्त्रीजीवनाचे वेगळेपण लक्षणीय आहे. त्यातील काही स्त्री व्यक्तिरेखा पुढीलप्रमाणे आहेत.

1. तारा :–

तारा ही आनंदाची आई आहे, ती आपल्या कुटुंबाशी अनेक नात्यांनी बांधलेली आहे, तिच्या या विविध रूपांचा, भूमिकांचा प्रत्यय ''झोंबी'' तून येतो,

ताराचे रूपवर्णन –

तारा ही रूपाने सर्वसामान्य आहे तिच्या रंगाचा उल्लेख तिच्या सासूच्या बोलण्यातून झाला आहे. तिची सासू उद्वेगाने म्हणते, ''आधीच ही सून म्हणणारी रांड बिरकुडांगत बाळली कोळ, ना रूप, ना रया, रंग तर काळा सजुगरा बरा....''

यावरून तारा ही रंगाने काळीसावळी असल्याचे प्रारंभीच लक्षात येते. तारा शरीराने अशक्त आहे. हे लेखक अनेक ठिकाणी दाखवितो. ताराची सासू ताराला, 'बिरकुंडागत वाळली कोळ (झोंबी पृ. 11) म्हणते, कंबळा भावाला सांगते, ''खरं सांगायचं तर तुला ही बरकुंडी बायकू शोभूनच दिसत न्हाई वाळल्या लाकडागत दिसती नुसती.....'' (झोंबी पृ. 14)

यावरून तारा आणि रतनू हा विजोड जोड असल्याचे लेखकाने दाखविले आहे. रतनू हा पैलवानी 'शरीरयष्टीचा तर तारा अगदी किरकोळ प्रकृतीची आहे.

बालपणापासूनच ताराची शरीरप्रकृती किरकोळ स्वरूपाची होती. दारिद्रय, उपासमार, नवऱ्याची मारहाण, पोराबाळांचे लेंढार त्यांची एकटीवर असलेली जबाबदारी, काबाडकष्ट, याचा परिणाम म्हणून या स्थितीत तिची प्रकृती ढासळत जाते. या अशा वर्णनातून ताराचे रूपवर्णन सर्वत्र सापडते.

1.2 विविध भूमिका :–

कुटुंब संस्थेत स्त्री ही विविध भूमिकांनी वावरत असते. विविध नात्यांची तिला आपली कामे करावी लागतात. त्यातून तिच्या स्वभावाची निरनिराळी वैशिष्ट स्पष्ट होतात. यासाठी कन्या, बहीण, सून, पत्नी, आई, आजी इत्यादी निरनिराळया भूमिकांनी ताराचे व्यक्तिचित्र रेखाटले आहे.

1.2.1 कन्या

भारतीय समाजात मुलीचा जन्म दुःखकारक मानला जातो, मुलगी म्हणजे परक्यांचे धन आहे असा समाजाचा दृष्टिकोण दिसतो. वन्य संस्कृतीनंतर कृषिवस्था सुरू झाली. तेव्हापासून विशेषतः हिंदू कुटुंबात स्त्रीचा दर्जा खालावला गेला. 'मुलीचा जन्म हा दुःखाचा जन्म' असे मानले जाई. कित्येक जातीजमातीत जन्मतःच मुलींना मारून टाकण्याची प्रथा सुरू झाली होती, ज्याच्या पदरी पाप त्याला मुली होती आपोआप असे मानले जाई. त्यामुळे तत्कालीन समाजात स्त्रीजीवनाला निकृष्ट जीवन भोगावे लागत होते.

विसाव्या शतकाच्या प्रारंभी वरील दृष्टिकोणात फारसा फरक झाल्याचे दिसत नाही. अशा काळात ताराचा जन्म झाला. कन्या म्हणून ताराचे रूप ''झोंबी'' मध्ये पाहण्यास मिळते. पण ते अस्पष्ट आहे. ती सहासात वर्ष माहेरात होती पुढे बारा तेरा वर्ष होईपर्यंत ती सारखी माहेरी पळून जाई. एवढ्या मोठ्या कालावधीचे चित्रण फारच अपूर्ण आहे. त्यामुळे एक कन्या म्हणून ताराचे रूप प्रभावी उतरलेले नाही.

आपल्या आई वडिलांवर असलेले ताराचे प्रेम, तिची अगतिकता काही प्रसंगातून जाणवते. कन्या म्हणून ताराचे व्यक्तिचित्र स्पष्ट नसण्याचे कारण असे दिसते की त्यामुळे निवेदकाचा जन्मही नव्हता, ताराचे निवेदकाला नाहीत असणे शक्य नाही. मिळालेल्या त्रोटक माहितीच्या आधारे निवेदकाने ताराचे बालपण चित्रारलेले दिसते. त्यामुळेच या रूपाचे वास्तवदर्शन वाचकांसमोर पूर्ण रूपात साकार होत नाही.

1.1.2 बहिण –

बहीण ही स्त्री असल्यामुळे तिला अबला म्हटले जाते. त्यातूनच बहिणीचे रक्षण करण्याची जबाबदारी भावावर येते. रक्षाबंधन आणि भाऊबीज या सणाच्या मुळाशी ते तत्त्व गृहीत धरलेले आहे. ताराला रामा आणि लिंगाप्पा हे दोन भाऊ आहेत. रामा तारापेक्षा वर्षांनी मोठा आणि लिंगाप्पा खूपच लहान असतो. या भावांवर ती खूप प्रेम करते.

1.2.3 सून

अवघ्या वर्षाची असताना ताराचा विवाह होतो. आणि ती यादवांची सून होते. तिच्या आईने तिला ''ह्यो बघ तुझा न्हवरा'' ''झोंबी'' (पृष्ठ 6) असे सांगून तिला सासरी पाठविलेले असते. यावेळी तिचे वय सहासात वर्षाचे असते .

सुनेच्या वाटेला येणारा सर्व छळ ताराच्या वाट्याला येतो. छोट्या सुनेला हाताखाली घेऊन सासू सर्व कामे करवून येते. कंवळा व आकी या नणंदा ताराशी भांडतात. नवरादेखील हाणमार करतो. नवविवाहीत तारा घाबरून जाते. सासरच्या माणसांबद्दल तिच्या मनात भिती उत्पन्न होते. सासर तिला नको वाटू लागते. त्यामुळे ती वारंवार माहेरी पळून जाते. माहेर आणि सासर गावातल्या गावात असल्याने तार आईकडे पळून जाई. ताराची आई ताराच्या सासूला समजावून सांगे, ''लेकरू अजून बारकं हाय, सांभाळून घ्या.''

एक सून म्हणून ताराची कारूण्यमूर्ती वाचकांसमोर काही प्रमाणात उभी राहते. नांदायला लागल्यापासून तिच्या वाट्याला केवळ छळच आला. तिला समजून घेणारे सासघरी कुणी भेटले नाहीत. अगतिकपणे अन्याय सहन करणारी, सासुसासऱ्यांना कोणताही विरोध न कारणारी, अशी एकाकी सोशिकवृत्तीची सून वाचकासमोर साकार होते. हे या चित्रणाचे काही प्रमाणातील यश म्हणता येईल.

1.2.4 पत्नी

स्त्री जीवनात पत्नीपदाला अतिशय महत्त्व आहे. मुलगी लग्न होऊन लग्न होऊन आपल्या नवऱ्याच्या घरी जाते. येथून तिचे पत्नी रूपातले जीवन सुरू होते. स्त्री पुरूष एका नैसर्गिक गरजेसाठी आणि वंशवृध्दीसाठी एकत्र येतात. त्यांच्यावर वैवाहिक संस्कार केले जातात त्यातून पतीपत्नीचा संसार सुरू होतो. रतनू आणि तारा हे विजोड पती पत्नीचे जोडपे आहे. रतनूच्या पैलवानी देहापूढे ताराचा किरकोळ देह शोभत नव्हता, म्हणूनच रतनूची बहीण कंबळा आपल्या भावाला सांगते. ''खरं सांगायचं तर तुला ही बुरकुंडी बायकू सोभूनच दिसत न्हाई. बाळक्या लाकडागत दिसती नुसती'' (झोंबी पृ. 14)

1.2.5 आई

तारा अठराव्या वर्षी आई बनली. पुढे अकरा बाळंतपणात तिला बारा मुलं झाली. त्यामध्ये आठ पोरी व चार पोरं झाली. ती अनुक्रमाने पुढीलप्रमाणे : (1) अनसूया उर्फ अनसा, (2) शेवंता (3) आनंदा (4) हिरा (5) हिरा (6) शिवा (7) धोंडाबाई (8) चंद्रा (9) सुंदरा (10) अप्पा (11) लक्ष्मी (11) आनसा (12) दौलत

तारा बारा अपत्यांची आई झाली. पस्तीशीच्या आतच तिला आठ अपत्ये झाली. पोराबाळांचे लेंढार तिच्या काळजीचे कारण होते. तिच्यावर मनाविरूध्द मातृत्व लादले गेले. नवरा मात्र साळसूदपणे अलिप्त राहिला. पोराबाळांच्या संरक्षण, संवर्धनाची जबाबदारी तिच्यावर पडली. आई म्हणून तिचे वात्सल्य दारिद्रयाच्या आगीत भस्मसात झाले. कोणावरही ती मोकळेपणाने प्रेम करू शकली नाही. मुलींना मनासारखे स्थळ देण्यात ती कमी पडली. मुलींना वाढवताना तिची दमछाक होत असे. एक कडेवर, एक बोटाला धरून चालणारे, एक पोटामध्ये हा क्रम तिने कित्येकवर्ष सोसला. ती कष्ट केल्याशिवाय पोटाला काही खाऊ शकली नाही. पोरींना मनासारखे काही देऊ शकली नाही. त्यांच्याकडे लक्ष देण्यास तिला वेळ सापडला नाही. त्याचा परिणाम छोटी शेवंता माती खाऊन चार वर्षातच मेली. चंद्राही रोगाला बळी पडली. सासुरवास असह्य होऊन सुंदराने नदीत आत्महत्या केली. मोठी अनसा टीबी होऊन औषधावाचून गतप्राण झाली.

आई म्हणून ताराची जीवनकथा भेदक आहे. दारिद्रयाच्या आगीत तिचे आयुष्य भाजून निघाले. पोरांचा परवडा पाहून ती हंबरडा फोडण्यापलिकडे काही करू शकली नाही.

कन्या, बहीण, सून, पत्नी, आई, अशा अनेक नात्यातून ताराची व्यक्तिरेखा वाचकांसमोर उभी राहते. प्रत्येक भूमिकेत तिचे कारूण्यपूर्ण जीवन वाचकांना हेलवून सोडते, वाचक अंतर्मुख होतो.

2. कंबळा

कंबळा ही आनंदाची थोरली आत्या. तिचा नवरा कोठल्यातरी चोरीत सापडतो. तुरूंगात जातो व तेथेच मरतो. कंबळा भावाच्या म्हणजे रतनूच्या घरी येते, ती ताराला हुकुमात ठेवू पाहते. तिचा अनेक तऱ्हेने छळ करते. सगळा संसार आपल्या हातात असावा असे तिला वाटते. रतनूच्या मनात ताराविषयी ती द्वेश निर्माण करते.

ताराला दोन मुली होतात तेव्हा ती रतनूला म्हणते, ''दादा, रांडला आता सोडून देऊ या. खरं सांगायचं तर तुला ही बुरकुंडी बायकू शोभूनच दिसत न्हाई. बाळक्या लाकडागत दिसती नुस्ती. शिवाय हिला पोरींचं लेंढार लागणार, तुझ्या गळयात दगुड पडलाय ह्यो. चारी बाजूंनी तुला ही खड्ड्यात घालणार बघ (झोंबी पृ. 14)

कंबळा ताराच्या चुका शोधत राहते. तिच्या विरूध्द वागून तिला भावाकडून मार बसविते. ताराने तिच्या भावाला भाकरी कशी दिली हे पटवून देवून ती ताराला भरपूर मार बसवते. नणंद भावजयीच्या नात्यात निर्माण होणारे पारंपरिक ताण व कंबळा यांच्या नात्यातही निर्माण होताना दिसतात.

विधवा कंबळाच्या सर्व भानगडी रतनूच्या लक्षात येतात. ताराला मुलगा झाल्यावर रतनू कंवळाला घराबाहेर काढतो.

कंवळा जशी दुष्ट स्वभावाची आहे. तशीच ती अनैतिक आहे. स्वतंत्र खोली घेतल्यावर ती स्वैराचारी बनते. तरूण बोलघेवड्या लोकांना खोलीत घेवून ती रातरात बसे. तिचा भाऊ तिला याबद्दल विचारतो तेव्हा ही भांडाखेर कबळा म्हणते, ''माझ्या पर्पंच्यात आता तू पडायचं काय कारण न्हाई. ज्या दिवशी तू मला सवता काढलंस, त्या दिवशी मी तुला मेलो नि तू मला मेलास...'' (झोंबी पृ. 221) रतनू तिला इभ्रतीने राहण्यास सांगतो तेव्हा ती फार चिडते व म्हणते, ''माझ्या मी इभ्रतीचे बघते, तुझ्या तू बघ. (झोंबी पृ. 222) असा रतनूचा अपमान करून ती त्याल गप्प बसवते.

कंबळाला बाबू नावाचा मुलगा असतो. त्याला ती शाळेत घालते, पण तो व्यवस्थित शाळा शिकत नाही. म्हणून ती त्याला कामाला पाठवते. तिने म्हैस घेतली पण तिच्यावरही वीज पडून ती मरते. अशी ती दुर्दैव आहे. यश म्हणून कसे ते तिच्या हाताला येतच नाही.

परिस्थितीने गांजलेली कंबळा कठीण परिस्थितीत दिवस काढते. आनंदा व रतनूचे भांडण होते तेव्हा आनंदा या कंबळाच्याच घरात लपतो. ती त्याचा मार चुकवते, आधार देते, तिचा पोरगा आळशी कामचुकार, दारूडा, पत्तेबाज आहे. या पोराला ती कंटाळते. त्याचे लग्न करून देते, तरी त्याच्यात सुधारणा होत नाही. ती फार दुःखी होते.

दुष्काळाच्या तडाख्यात कंबळाचा संसार ढासळतो. पोरगा घर गहाण टाकतो. शेवटी ती व्यथित होते. ताराचा छळ करणारी, स्वैराचाराने वागणारी, आयुष्यभर भणंग जीवन जगणारी कंबळाची व्यक्तिरेखा ताराच्या जीवनावर व ग्रामीण स्त्री जीवनावर प्रकाश टाकणारी आहे. स्त्री जीवनातील दुर्दैवाचे दशावतार तिच्या जगण्यातून समूर्त होतात.

3. आकणी :

आकणी ही आनंदाची धाकटी आत्या आहे. ती रतनूची बहीण आहे. सिद्धनेर्ली या गावी तिचे सासर असते. तिची सासू अतिशय दुष्ट स्वभावाची असते. आकणी खूप कष्ट करते. तरीही तिला उपाशी राहवे लागे. आकणी सासुरवाडीला कंटाळते. उपासमार आणि अतिकष्ट यामुळे ती माहेरी कागलला पळून येते. आकणी स्वभावाने आडदांड आहे. एवढी संसारी स्त्री झाली तरी तिच्यात प्रौढपणा नाही. रागावून, बडवून काढल्याशिवाय ती कुणाचे ऐकत नाही. त्यात तिला माहेरचाही ओढा आहे, त्यामुळे ती सारखी पळून येते. आकणीच्या वागण्याचे रतनू चिडे. एकदा ती अशी पळून आल्यावर रतनू तिला बडवतो आणि म्हणतो, ''थांब, तुझ्या आयला, तुझा हातपाय बांधून हिरीतच टाकून देतो. मर बुडून. माझं नाक वर ऱ्हाउ देईना झालीयास (झोंबी पृ. 19) आकणीच्या मनावर या शब्दांचा काहीच परिणाम होत नाही. त्यामुळे रतनू चिडतो. तिच्या कमरेला दोर बांधतो. मोटेच्या चाकावरून विहिरीत सोडतो. खोल विहिरीत बुडवून आकणीला तो परत वर काढायचा व विचारायचा, येशील का पळून ?(झोंबी पृ. 20) सासरचा छळ कमी म्हणून की काय मोहेरीही तिच्या वाट्याला छळ येतो.

आकणी काही केल्या नवऱ्याच्या घरात नांदत नाही. तिचा वनराही एक दिवस तिला बडवत नेतो. खोलीत कोंडून ठेवतो. दोन दिवस उपाशी ठेवतो. रतनू तिच्या नवऱ्याला दम देतो. शेवटी भांडण होऊन आकणीचा नवरा लग्नाचा सर्व खर्च रतनूकडून भरून घेतो. रतनू तिचे एका गरीब माणसाशी लग्न करून देतो. धोंडूबाईच्या अडाणी, आडदांड, अल्पवयीन मुलींच्या संसाराचे व रतनूच्या कौटुंबिक स्थितीचे चित्रण आकणीच्या वक्तिचित्रातून सहज घडते.

4. रखमाबाई

रखमाबाई ही आनंदाची धाकटी मामी आहे. आनसा मरण पावल्यावर लिंगाप्पा रखमाबाईशी लग्न करतो. रखमाबाई अतिशय कष्टाळू आहे. लिंगाप्पाच्या ढासळत्या संसाराला ती सावरते. आनंदाला ती भाऊ मानते. त्याला भाऊबीजेला ओवाळते. रखमाबाईने घरी चटणीमाशीन घेतली होती. त्यावर काम करून ती घरखर्चासाठी पैसा मिळविते. आनसाच्या मुलाला बाळूला ती चांगले सांभाळते. सावत्रपणा दाखवित नाही. आठनऊ मुलं झाल्याने रखमाबाई खचून जाते. त्यात तिचा नवरा दारूडा बनतो. तरी स्वतःच्या हिंमतीवर ती संसार चालविते.

ग्रामीण स्त्री संसारचक्रात व पोराबाळांच्या जबाबदारीने कशी हतबल होते, हे रखमाबाईच्या चित्रणातून स्पष्टपाणे दिसते.

5 उदगावची आत्ती :

आनंदाचा थोरला मामा रामा याची आत्ती उदगावला राहत असे. रामा तिच्याकडेच राहतो. तिने त्याला आपला जावई करून घेतले. तिच्या दोन मुलींपैकी थोरली मुलगी रामाला दिली होती. दुसरी लग्नायोग्य होते जेव्हा ती ताराला विचारते, ''तारा तुझी लेक देतीस का, माझी लेक लिंगाप्पाला देवू ?'' ''झोंबी'' (पृ. 55) ताराला वाटते, ''जर, आत्तीनं दुसरीबी पोरगी भावाला दिली तर लिंगूबी गाव सोडून उदगावला जाईल. माझा ह्या गावातला आधार तुटलं मी पोरकी होईल.'' (झोंबी पृ. 55) त्यामुळे तारा आनसाचे लग्न लिंगाप्पाशी लावते. उदगावच्या आत्तीला लिंगाप्पासारखा जावई मिळत नाही.

उदगावची ही आत्या हरप्रकारे रामा व लिंगाप्पाला आपल्याकडे घेऊ पाहते. पण फक्त रामाच तिच्याकडे राहतो. उदगावाच्या या आत्याच्या चित्रणातून ग्रामीण स्त्री जीवनातले लेक–जावई–सासू नात्यातले संबंध स्पष्ट होतात. लेक–जावई आपल्या जवळ राहवेत असे ग्रामीण सासूला वाटते. लेकीच्या ओढीतून हे घडत असते. ताराला जसे लेकीचे आकर्षण आहे तसे या आत्तीलाही मुली जवळ हव्या वाटतात. त्यातून स्त्री मनातील वात्सल्याचे दर्शन घडते.

6. ***समा :***

समा ही हिराची नणंद आहे. ती भावाच्या म्हणजे शंकरच्या घरी राहते. हिरा आणि शंकर यांचा संसार सुखाचा असतो. शंकरचे आईवडील मरण पावल्यावर समा कायमची शंकरकडे येते. तेव्हापासून हिराचा सासुरवास सुरू होतो.

समा ही एक चवचाल बाई म्हणून गल्लीत ओळखली जाते. ती गावाच्या घरात शिरल्यावर हिराला सळो की पळो करून सोडते. हिरा रोगट आहे, वांझ आहे, या कारणास्तव ती हिराला सहा महिन्यात घराबाहेर काढते. ती सगळयांना अगदी पुरूषासारख्या शिव्या देते. (झोंबी पृ. 313) हिरा घरातून कायमची निघून कायमची निघून जावी म्हणून हरत-हेची ती प्रयत्न करते. शंकर एका मळयात कामाला जाई. त्या मळयाची वाट निसरड्या पांदीतून जाई अशा रस्त्यावरून हिराला ती शंकरच्या भाकरी घेऊन पाठवी. छोट्या छोट्या कारणावरून ती हिराला बदडून काढायची. भाकरी तयार झाली नसेल तर, ''अजून तुझ्या भाकरीबी झाल्या न्हाईत रांडं'' (झोंबी पृ. 313) असे म्हणून ती हिराला मारत असते.

समाचा नवरा बिचारा गरीब होता. समा त्याच्यावर हुकुमशाही गाजवी. तो निमूटपणे तिच्या म्हणण्याप्रमाणे वागे. समाचा स्वभाव गरम, वागणूक तापट, सतत मोठमोठ्याने बडबडणे तिला आवडे. नवरा तर घाबरून लांब, लांब असे. हिराच्या आईला ती म्हणते, ''माझ्या भावाचं तू तुझी आजारी लेक देऊन वाटूळं केलंस. तुझी लेक ठार नांदवून घेणार नाही.'' (झोंबी पृ. 317) हिराची आई व समामध्ये खूप भांडण होते. समा हिराला नांदवयास तयार होते. पण तिचा स्वभाव बदलत नाही. ती हिराला छळत राहते, व शेवटी घराबाहेर काढते.

ग्रामीण भागात तसेच एकूण स्त्री जीवनातच नणंद–भावजय या नात्यात एक कायमचा तिढा असल्याचे दिसते. स्त्रीच स्त्रीला समजून घेत नाही, तीच तिच्या दुःखाचे कारण बनते. आपल्या संसारात इतर कोणत्याही स्त्रीचा शिरकाव होऊ नये असे ती मानते. त्याचा एक नमूना म्हणून समाकडे पाहता येते.

7. गौण स्त्री व्यक्तिरेखा

1912–13 च्या सुमारास गावात खूप दुष्काळ पडतो. प्रचंड रोगराई वाढते. यातून धाकट्या चुलत्याची बायको (झोंबी पृ. 4) मरता मरता वाचते. दारिद्रय आणि रोगराईला तोंड देणारी ग्रामीण स्त्री येथे लक्षात येते.

7.1 गावातलया जोगतिणी आणि नायकिणी–

''झोंबी'' तून गावातल्या सांस्कृतिक, धार्मिक, सामाजिक स्थिती गतीवर प्रकाश पडतो. या संदर्भात गावातल्या जोगतिणी आणि नायकिणी यांचे चित्रणही ''झोंबी'' मध्ये वाचण्यात मिळते. त्यातून स्त्री जीवनाचे विविधांगी दर्शन घडते.

7.1.1 यल्लू जोगतीण

कालगमध्ये अनेक जोगतिणी आणि नायकिणी होत्या. त्यापैकी यल्लू जोगतीण देखाणी होती. ती कागलमध्ये आनंदाच्या गल्लीत राहत होती. तिचे घर माडीचे होते. ते तिला तिच्या आप्पाने बांधू दिले होते. (झोंबी पृ. 639)

तरूण यल्लू जोगतीण नायकिणीसारखी नटत असे. तिचा आप्पा ठेवलेला पुरूष एक डॉक्टर दिवसा कधी या जोगतिणीच्या घरी जात नसे. तोही देखणा गोरा आणि स्वच्छता असणारा होता. यल्लू जोगतीण ही मूळ धनगर समाजातील स्त्री होती. ती जोगतीण झाली होती.

7.1.2 रखमा जोगतीण माळयाची बाई

रखमा जोगतीण आणि माळयाची बाई या रतनूच्या मैत्रिणी असतात. माळयाची बाई रतनूच्या तरूणपणातील मैत्रिणी होती. ती

त्याच्यावर मळयाच्या वाटेवर रहात होती. तिला मुलबाळ नव्हते. रतनू पुष्कळवेळा तिच्याकडे जाई गप्पा मारीत असे (झोंबी पृ. 21,22) ती पुढे ताराला सहकार्य करते.

रखमा जोगतीण अतिशय धार्मिक होती. ती जोगतीण असली तरी इतर जोगतीणींसारखी वागत नसे. प्रत्येक शुक्रवारी आंघोळ करून पदरातच फक्त पाच घरे निमित्ताला माग असे. तिने ठेवलेला सोयराही साधा कोरडवाहू शेतकरी होता. तो पाच सहा महिने कोरडवाहू शेतात राबे नि वर्षाची बेजमी गोळा करी. सालभर तो, रखमा बसून खात. त्यांनाही मूलबाळ नव्हते. (झोंबी पृ. 22) या रखमाकडेही रतनू पुष्कवेळा जात असे गप्पा मारत असे.

माळयाची बाई व रखमा जोगतीण दोघीही समजूतदार आहेत. दोघीही तारापेक्षा मोठ्या आहेत. या मैत्रीणीचे रतनूच्या तरूणपणातच संबंध जुळले होते. ताराही आपल्या मित्राची बायको आहे, म्हणून दोघीही ताराला खुश ठेवण्यासाठी धडपडत राहतात.माळयाची बाई व रखमा जोगतीण या दोघींमुळे ताराचा छळ संपतो. त्यांच्यामुळेच तारा आपल्या संसाराचा ताबा घेते, संसाराला लागते, तारा खुषीत असल्याचे पाहून दोघींना मनोमन समाधान मिळते.

गावातील स्त्री पुरूष संबंधावर या दोघींमुळे प्रकाश पडतो. तारा या दोघींचा किंवा या दोघी ताराचा तिरस्कार करताना दिसत नाहीत. उलट त्या एकमेकींच्या सुख दुःखात सहभागी होतात. हे त्यांचे वेगळेपण येथे दिसून येते.

7.1.3. नायकीण

कागलमध्ये नायकीणींचे बरेच मोठे प्रस्थ होते. त्यापैकी दत्तू सावकाराने एक नायकीण आपल्या माडीच्या घरात आणून ठेवली होती. या नायकीणीपायी या सावकाराने आपली बायका मुले घरातून हाकलून दिली. (झोंबी पृ. 39) नायकीणीच्या सर्व कुटुंबाला त्याने आधार दिला.

या नायकीणीला आई आणि पाच भाऊ होते. सर्वजण छानपैकी दिसणाऱ्या माडीच्या घरात राहत होते. या माडीबद्दल त्यातल्या माणसांबद्दल आनंदला कुतूहल वाटायचे. तो म्हणतो, ''या माडीला दोन खिडक्या आणि दार होते. त्या खिडक्यांना रंगीत फुलांचे पडदे वाऱ्यानं ते झुळझुळायचे. सकाळी बाहेरच्या गटारात मोरीतनं येणारं ते झुळझुळायचे. सकाळी बाहेरच्या गटारात मोरीतनं येणारं पाणी सुगंधी असायचं. ती नायकीण क्वचित दिसायची. माझ्या जन्मात मी पहिल्यांदाच स्वच्छ लुगडं नेसलेली बाई पाहिली. तिच्या काळावरच्या बारीक ओला गंध, दंडाच्याही वर चार बोटं असलेली झालरीची चोळी, रंगीत डिसाईनचं पातळ केसांचे कानावरून फुगे पाडून मागं घेतलेली वेणी पाहिली'' (झोंबी पृ. 39,40) या नायकीणीची राहणी पाहून छोट्या आनंदाला वर्तमानपत्रातील पाहिलेल्या फोटोतील सुंदर बायकांची आठवण होते.

या नायकीणीचे चित्रण गावातल्या स्त्री जीवनातले वेगळेपण दर्शविते. तिच्या पार्श्वभूमीवर ताराच्या घरचे दारिद्रय, उपासमार, तिचा छळ, अगतिक जगणे अधिक विचार करायला लावते.

7.1.4 काही जोगतिणी नायकीणी

यल्लू जोगतीणीसारख्या अनेक जोगतिणी गावात असतात. गावात फक्त दोन माडीची घरं होती. दत्तू सावकाराने ठेवलेल्या नायकीणीचे व दुसरे यल्लू जोगतिणीचे. बाकी सर्व घरे भुईलगत बैठी होती. ही नायकीण व जोगताण सोडली तर बाकीच्या सर्वसामान्य दुर्लक्षित जीवन जगणाऱ्या आहेत.

या जोगतिणींचे जत्रेत सौदे ठरत. अनेक पैसेवाले, हौशी, वतनदार लोक देखण्या तरूण जोगतिणी हेरत नि त्यांना ठेवत किंवा त्यांच्याशी संबंध जोडून राहत (झोंबी पृ. 213) या यात्रेत पोरींचे चांगले सौदे होत असल्याने तालुक्यातील बहुतेक जोगतिणी आपल्या तरूण मुलींना येथे आणत. सगळ्या जत्रेत वस्तूप्रमाणे या मुलींचे प्रदर्शन केले जाई.

''गावाच्या बाहेर रानात मिलटरी लोकांचा तळ पडे. 1941–42 चा काळ हा धामधुमीचा होता. इंग्रज अधिकारी दाखवत. जोगतिनींना भरपूर पैसा मिळे. कित्येक वेळा या जोगतिणींना गोरी गोरी मुले होत. एका जोगतिणीला आवळ्या दोन गोऱ्या पोरी झाल्या. (झोंबी पृ. 26) याची गावात चर्चा होई. या प्रमाणे नायकिणींचे देखील पंचक्रोशीत काही प्रमाणात प्रस्थ होते. धर्मकारणाच्या नावाखाली स्त्री वर्गाचे होणारे भोगवादी शोषण येथे चित्रित जाले आहे. 19 व्या शतकाचं स्त्रीदास्यविमोचनाची चळवळ सुरू होती तरी अशा ठिकाणी त्याचा लवलेशही दिसत नाही. गावातील प्रतिष्ठीत लोक भोगवादाकडे झुकलेले होते. संस्कार आणि नीतीमत्तेचे जीवन जगणाऱ्या स्त्रिया दारिद्रय, उपासमार सहन करीत होत्या. भारतीय संस्कृतीचे मोठे गुणगाण केले जाते पण परंपरेच्या या जगरहाटीत स्त्री अशी विकली जात होती. जनावरांच्या बाजारात जशी बोली चालते, सौदे ठरतात तसे या नायकिणींचे, जोगतिणींचे सौदे चालत. यातून खालच्या समाजातील स्त्रीजीवनांचे दाहक दर्शन घडते. स्त्री ही लक्ष्मी आहे, सरस्वती आहे देवी आहे अशा सांस्कृतिक घोषणांच्या पार्श्वभूमीवर वाचक येथे अंतर्मुख होतो. गावातील भोगविलासी वृत्तीचे हे चित्रण येथे अल्पसे असले तरी ते गाव संस्कृतीवर गहिरा प्रकाश टाकणारे आहे.

7.2 बाळा सणगरीण –

बाळा सणगरीण समजूतदार आहे. स्त्रीकडे पाहऱ्याचा तिचा दृष्टिकोण उदारातून व्यक्त होतो. नात झाली नात झकास जोडी झाली. तुझ्या लेकाच्या पोटाला (झोंबी पृ. 11) एका बाजुला बाळा सणगरीण हिचा कन्याजन्माकडे पाहण्याचा स्वागतशील दृष्टीकोण तर दुसऱ्या बाजुला ताराच्या सासूची पारंपरिक दुस्वासाची भूमिका वाचकाला अंतर्मुख करते. दोघांही ग्रामीण अशिक्षित स्त्रिया पण बाळा सणगरीण ही नव्या दृष्टिने मुलींकडे पाहते.

रतनू ताराला मारहाण करतो. तारा बाळा सणगरीणीला आपले दुःख सांगते. जखमा दाखवते. दयाळू सणगरीण तिच्या अंगाला रक्तचंदन उगाळून लावते. ताराची चोळी जखमांना चिकटून बसते. ते पाहून ती हळहळते. ताराचा छळ करणा–या रतनूला व कंबळाला शिव्या

देते. ताराच्या अंगातील चोळी रतनूला व कंबळाला शिव्या देते. ताराच्या अंगातील चोळी कातरीने कातरून काढते. तिला आपल्या घरात आश्रय देते.ताराचे दुःख पाहून रतनूचा आडदांडपणा पाहून सगळ्या बायकांदेखत ती रतनूला शेलक्या पुरूषी शिव्या देते. समजावून सांगते.बायकोला कसे वागवावे नवरा बायकोने कसे गुण्यागोविंदाने राहवे हे पटवून देते.

ती रतनूला जशी समजावते तशी तारालाही समजावते. दहा अकरा वर्षांच्या आनसाचे तारा लग्न ठरवितो. लिंगाप्पा हा आनसापेक्षा चौदा पंधरा वर्षांनी मोठा असतो. या विजोड जोड्याच्या लग्नाला बाळा सणगरीण विरोध करते. ती ताराला म्हणते, "तारा, अग पोरगी नाजूक, देखणी हाय. कुठंबी खपंल. एवढ्या दांडग्या लिंग्याला कशाला देतीस तिला ?भाऊ असला म्हणून काय झालं" (झोंबी पृ. 54) ती ताराला समजावून सांगण्याचा प्रयत्न करते पण तारा ऐकत नाही. तरी 'पोरीचा गात करू नकोस' असे म्हणून बाळा सणगरीण तिला खूप समजावते.

दुसऱ्याचे दुःख समजून घेणारी, अडाणी असली तरी माणुसकीचा झरा असणारी बाळा सणगरीण मनावर ठसते. तारा व रतनूच्या कौटुंबिक संबंधावर तिच्यामुळे अधिक प्रकाश पडतो.

7.3 तानामावशी –

तानामावशी हिला गावात सर्वजण ठोलयाची ताना म्हणून ओळखत. आनसाचा बाळू याला तिने सांभाळले. तिचा स्वभाव प्रेमळ आहे. लिंगाप्पाच्या हाताखाली अनेक ड्रायव्हर, मधला मजुरी करणारा तर धाकटा शाळेत जाणारा, तिचा नवरा बाबा होऊन दूर कुठेतरी निघुन गेलेला असतो. तरी ती संसाराचा गाडा स्वतः चालवते. कोणाकडेही भाकरी करण्याचे व इतर अनेक कामे ती करीत असते.

8. इतर काही स्त्री व्यक्तिरेखा :

ताराचे दुःख पाहून गावातील सासुरवाशिणी (झोंबी पृ. 16) कळवळतात. रतनूला मुलगा झाला म्हणून गावातील बायका (झोंबी पृ. 17) कारवेत पाण्याच्या घागरी घेऊन धावतात. देवाच्या पायावर पाणी ओततात. गावात आलेल्या गोऱ्या साहेबांना महारवाडा, मांगवाडा येथील तरूण पोरी (झोंबी पृ. 25) स्वयंपाक करून देतात. जोगतिणीला आवळ्या जावळ्या गोऱ्या पोरी (झोंबी पृ. 26) होतात. कागल गावात पिंपळाच्या पारावर बसून शाळेतल्या मुलांना कणसं भाजून विकणारी म्हातारी (झोंबी पृ. 39) दारिद्रयात दिवस काढते. ब्राह्मणांच्या बायका (झोंबी पृ. 39) मात्र केवड्याची पाने अंबाड्यात लावून फिरत. शाळेतल्या मुली (झोंबी पृ. 47) फेरे धरून फिरत सरस्वती पूजनाचा कार्यक्रम करतात. गल्लीतल्या पोरी (झोंबी पृ. 48) गौरी उत्सवात फेरे धरून छान नाचतात. आनंदाचा मित्र वसंता पोरका होतो. तेव्हा त्याची वृध्द विधवा आजी (झोंबी पृ. 209) त्याचा प्रेमाने सांभाळ करते. मुलीच्या या मुलासाठी ती म्हातारपणीही रोजगाराला जाते. वसंताची आई त्याच्या बालपणात मरते तर त्याचा बाप दुसरे लग्न करतो. त्यामुळे ही वृध्द आजी दुधावरच्या सायीप्रमाणे त्याचा सांभाळ करते. त्यातून तिचे वात्सल्य प्रकट होते. आपल्या फाटक्या संसाराला सावरणारी गड्याची बायको (झोंबी पृ. 258) शेण गोहा करणे, माळवं घेणे, जळणासाठी रानातल्या काटक्या कुटक्या गोळा करणे अशी कामे करते. यातून गावातल्या स्त्रीजीवनाचे विविध स्तर, अनुभवाचे विविध पदर येथे चित्रित होतात.

समारोप :

"झोंबी" तून आनंद यादवांची जीवनगाथा चित्रीत झाली आहे. त्यांचे ग्रामीण भागातील कौटुंबिक व सामाजिक अनुभव ग्रामीण संस्कृतीवर प्रकाश टाकतात. विशेषतः ग्रामीण स्त्रीजीवनाचे विविधांगी दर्शनही वाचकाला अंतर्मुख करणारे आहे. यादवांनी स्त्री जीवनाचा व्यापक दृष्टिकोण आपल्या लेखनातून व्यक्त केला आहे.

स्त्री ही एक माणूस आहे. तिला सामाजिक प्रतिष्ठा लाभली पाहिजे. भारतीय राज्य घटनेने दिलेले हक्क तिला मिळाले पाहिजेत. संधीची समानता आणि निवडीचे स्वातंत्र्य स्त्रीला मिळावे म्हणून प्रयत्न होणे गरजेचे आहे. स्त्रीला स्वतंत्र व्यक्तिमत्व आहे. शरीराबरोबर तिला संवेदनशील मन आहे. हे जाणले पाहिजे. पण तारा असो की इतर स्त्रीया असो त्यांच्या जीवनाची कुतरओढच झाली आहे. हे लेखकाने झोंबी तून प्रकर्षाने दाखविले आहे.

आनंद यादव यांची चौफेरदृष्टी, स्त्री जीवनातील विविधांगी अनुभव उत्कटपणे आविष्कृत करण्याची शैली प्रभावी वाटते. आपले आत्मानुभव विविध तरंगातून स्पष्ट करताना स्त्री जीवनातील संवेदनशीलता, जिव्हाळा, माणुसकीचा उत्कट गहिवर तसेच स्त्रीची अगतिकता दुःखभोग आणि तिने शिक्षणाद्वारे शोधलेल्या विकासाच्या दिशा यांचे आशावादी दर्शन समर्थपणे घडते. हेच "झोंबी" चे वेगळेपण आहे.

संदर्भटीप :

1. आनंद यादव, "काचवेल", (आनंद यादव) मेहता, पब्लिशिंग हाऊस, पुणे 1997, पृष्ठ 217
2. आनंद यादव' "मराठी ग्रंथजगत", (मासिक) मेहता, पब्लिशिंग हाऊस, पुणे ऑक्टोबर 1998, पृष्ठ 8–9
3. पु.ल. देशपांडे, "झोंबी" (आनंद यादव) मेहता, पब्लिशिंग हाऊस, पुणे ऑक्टोबर 1987, प्रस्तावना पृष्ठ 18
4. तत्रैय, मलपृष्ठ

Publish Research Article
International Level Multidisciplinary Research Journal
For All Subjects

Dear Sir/Mam,

We invite unpublished Research Paper,Summary of Research Project,Theses,Books and Book Review for publication,you will be pleased to know that our journals are

Associated and Indexed,India

- International Scientific Journal Consortium
- OPEN J-GATE

Associated and Indexed,USA

- EBSCO
- Index Copernicus
- Publication Index
- Academic Journal Database
- Contemporary Research Index
- Academic Paper Databse
- Digital Journals Database
- Current Index to Scholarly Journals
- Elite Scientific Journal Archive
- Directory Of Academic Resources
- Scholar Journal Index
- Recent Science Index
- Scientific Resources Database
- Directory Of Research Journal Indexing

Golden Research Thoughts
258/34 Raviwar Peth Solapur-413005,Maharashtra
Contact-9595359435
E-Mail-ayisrj@yahoo.in/ayisrj2011@gmail.com
Website : www.aygrt.isrj.net